# चांगला शोमरोनी

## आजारी दु:खी आणि पिडीतांची सेवा करणे

मुलांना शिकवणाऱ्यांनी C4b हा अभ्यास वाचावा.




कित्येक लोक गरीब आणि संकटात का असतात? याचे एक कारण म्हणजे दुष्ट आत्मे त्यांना खोटया नाटया गोष्टी सांगतात लोकांना पाप करायचे असेल तर ते ह्या खोटया गोष्टींवर विश्वास ठेवतील आम्ही लोभी अनीतीने वागणारे आणि अप्रामाणिक असावे असे दुष्ट आत्म्यांना वाटते परंतु येशू ह्या पातकांपासून आणि खोटेपणापासून लोकांची सुटका करतो. तो आमची अंत: करणे बदलून टाकतो आणि आम्हांला नवी इच्छा असणारे तसेच पाप न करण्याची इच्छा असणारे लोक असे करतो.

### 1. देवाच्या वचनाने आपल्या अंत: करणाची व मनाची तयारी करा

गरजूंना मदत करणे हा आमचा ह्या अभ्यासामागचा हेतू आहे. प्रभूने तुम्हांला व तुमच्या मंडळीला गरजूंसाठी खरेखूरे प्रेम द्यावे यासाठी विनंती करा प्रीती सत्कर्मे करते.

पाहा लूक 10:25-37 मध्ये काळजी घेणाऱ्या शोमरोनी माणसाने प्रत्यक्ष प्रेमाचे प्रात्यक्षिक कसे दाखवले.




*(उत्तरे: शोमरोनी माणसाने जखमी प्रवाशाची शुश्रूषा करून प्रत्यक्ष प्रेमाचे प्रत्यक्षिक दाखवले. अशा प्रकारे आपला विश्वास दाखवणाऱ्या विश्वासणाऱ्यांना सार्वकालिक जीवन देण्याचे येशूने अभिवचन दिले आहे.)*

अशाच प्रकारे वागणाऱ्यांना येशू काय अभिवचन देतो?

*(उत्तर: लूक 10:25 ह्या वचनाची 47 व्या वचनाशी तुलना करा)*

**पाठ करा** 1 योहान 3:17-18

### 2. पुढील आठवडयातील कार्यक्रमांविषयी तुमच्या सहकाऱ्यां बरोबर योजना आखा.

तुमची योजना कागदावर उतरवा आणि पुढच्या उपासनेच्या वेळी तिची घोषणा मंडळीसमोर करा. नेमकी योजना आखा. गरजू लोकांना शोधून काढण्याची योजना आखा आणि मग गलती 9:10 मध्ये सांगितल्या प्रमाणे

त्यांची सेवा करा, “तर मग जसा आपणाला प्रसंग मिळेल त्याप्रमाणे आपण सर्वांचे व विशेषत: विश्वासाने एका घरचे झालेल्यांचे बरे करावे.”

**3. आगामी उपासना सभेविषयी सहकाऱ्या बरोबर योजना आखा.**

समाजातील दु:खी गरजू लोकांसाठी उपासनेच्या वेळी प्रार्थना करा.

आध्यात्मिक विजयाबद्दल देवाची स्तुती करा. लोकांना साक्षी देण्यास आणि गेल्या आठवडयातील कामाचा अहवाल सांगण्यास सांगा.

लूक 10:25-37 थोडक्यात सांगा. चांगल्या शोमरोन्याचा येशूने सांगितलेला वृत्तांत्त सांगण्यासाठी एखादा मदतनीस तयार करा. प्रथम प्रत्येकाला काळजी पूर्वक ऐकून दोन गोष्टी शोधण्यास सांगा:

1) काळजी घेणाऱ्या शोमरोन्याने प्रेमाचे प्रात्याक्षिक कसे दाखवले.

2) असे वागणाऱ्यांना येशूने कोणते अभिवचन दिले.

नंतर, निरनिराळया लोकांना त्यांना काय समजले ते विचारा.

आपल्या अंत: करणांचे परीक्षण करा, आपली पापे कबूल करा आणि प्रभुभोजन ह्या प्रभुभोजनाची ओळख देण्यासाठी तुम्ही किंवा तुमच्या मदतनीसाने 1 करिंथ 10:16-17 वाचावे आपण ख्रिस्ताच्या शरीरात सहभागी होतो हे मग स्पष्ट करा. देवाचे वचन देहधारण करून आमच्या मध्ये वस्ती करण्यास आले. त्याचा जन्म बेथलहेम येथे झाला येथे बवाजने शेताची कापणी केली ‘बेथलहेम’ म्हणजे ‘भाकरीचे घर; येथेच येशू देहधारी झाला जेणे करून त्याला आमच्या साठी जीवनाची भाकरी होता आले.

**देवाचे वचन आचरणात आणा पर्याय:**

**पर्याय 1.** चांगला शोमरोनी मोठया माणसांनी आणि मुलांनी लूक 10:25-37 मधील कथावृत्तांत्तचे एक त्रितपणे नाट्यीकरण करावे. लहान मुलांना प्रवाशावर हल्ला करणाऱ्या चोर लुटारूंची भूमिका द्यावी मोठया माणसाने गाढवाची भूमिका करावी.

**पर्याय 2.** श्रीयुत परंपरावादी कोणीतरी “श्रीयुत परंपरावादी” ही भूमिका करावी ते शोमरोनी माणसाशी सहमत आहेत का ते विचारा तो युक्तिवाद करतो की आपण सामाजिक कार्यासाठी वेळ वाया न दवडता सर्व वेळ येशूसाठी आत्मे जिंकण्यात घालवला पाहिजे. लोकांना याचे उत्तर देण्यास सांगा. लोक उत्तर देण्यास लाजत असतील तर तुम्हीच स्वत: तुमच्या शब्दात उत्तर द्या. येशूने आपल्याला काय करायला सांगितले ते स्पष्ट करा.

**पर्याय 3.** मेंढरे आणि शेरडे मत्तय 25:31-46 मधील मेंढरे आणि शेरडे ह्या दृष्टांताचे नाट्यीकरण करा.

**निवेदक** (प्रौढ व्यक्ती) राजा मेंढरे व शेरडे हे न बोलणारा भाग वाचून दाखवा.

**राजा** (प्रौढ व्यक्ती): राजाचे संवाद वाचा किंवा सांगा.

**मेंढरे** (मुले): यापैकी एकजण शेरडाचे संवाद वाचावेत किंवा सांगावेत.

**पर्याय 4.** सैतानाची धमकी खोडून काढा तुम्ही पुढील कविता वाचा किंवा म्हणा यासाठी दोन व्यक्तींची मदत घेता येईल:

वक्ता #1, थट्टेच्या सुरात

भुतांना हेवा मत्सराला प्रोत्साहन द्यायला आवडते.
असा कडवटपणा! काय लोकांची कुरकुर!
ते पैशांसाठी आसुसलेल्या हातांवर आणि स्वर्थी
फायद्यासाठी आपले आत्मे विकणाऱ्यांवर झडप घालतात,

वक्ता #2, आनंदी निश्‍चयी सुरात

भुतांना खुशाल धुनष्य सज्ज करू देत,

त्याला मत्सराचा जळता बाण लावू देत.

आमचे चिलखत भक्कम आहे, त्याला तडा जाणार नाही.

कितीही जोराचा तडाखा बसला तरी आमचा विश्वास डगमगणार नाही!

गरजूंना मदत करण्यासाठी आठवडयातील तुम्ही आखलेल्या कार्यक्रमांची घोषणा करा. गरजू शेजारी व मित्रांची नावे तुमच्या लोकांनी सांगावीत तसेच त्यांना काय करायला आवडेल ते ही सांगावे मग कोण आणि केव्हा एकत्रितपणे काम करील ते ठरवण्यास त्यांना मदत करा. निश्‍चित योजना आखा.

दोन किंवा तीन जणांचे गट करून एकमेकांना मदत करा. एकमेकांसाठी प्रार्थना करून प्रोत्साहन द्या तसेच योजना आखा.

Copyright 2004 © by Paul-Timothy. May be freely copied. Download from www.Paul-Timothy.net